**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

माहितीचा अधिकार

**तक्रार क्रमांक: ९३/२०२३**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्री. राजु मोतीरामजी गिरडकर, मु. पो. सावरगाव ता. नरखेड जि. नागपूर | सहायक कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद नागपूर | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद नागपूर |

## सुनावणी दिनांक १६.१२.२०२४

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. २०४२/२०२० दिनांक १७.०८.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक १६.१२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री. विशाल मदन ओसारी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री. यु. एल. चांदेकर उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधीलकलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय (अपील क्र. २०४२/२०२०) मध्ये दिनांक १७.०८.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. “अपीलार्थी यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या आत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जन माहिती अधिकारी यांना पूर्व सुचना देवून कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप होणार नाही, याची काळजी घेवून संबंधीत मोजमाप पुस्तिकेचे जन माहिती अधिकारी यांचेकडून अवलोकन प्राप्त करुन घ्यावे व मिळालेल्या माहितीची कार्यालयातील मुळ दस्ताऐवजाबरोबर पडताळणी करुन खातरजमा करावी. तसेच ज्या घरांना नळ जोडणी देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायत कार्यालयातील पाणी पुरवठा विभागात उपलब्ध असलेली नळ जोडणीची यादी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करण्यात यावी. अशी यादी ग्रामपंचायत पाणी पुरवठा विभागात उपलब्ध नसल्यास संबंधीत पंचायत समिती अथवा ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असलेली कागदपत्रे अपीलार्थी यांचा माहिती अर्ज कलम ६(३) नुसार अथवा कलम ५(४) व ५(५) नुसार सहायक जन माहिती अधिकारी व मानिव जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत करुन त्यांचेकडून सदर माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त करुन घेतलेली माहिती अपीलार्थी यांना मिळेल याची खातरजमा करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास विनाविलंब सादर करण्यात यावा” या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आला होता.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक २३.०३.२०२३ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल

केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, "आयोगाचे आदेश होवूनही अद्यापपर्यंत माहिती मिळाली नाही. सदर कामात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधीतांनी माहिती पुरविली नाही. आयोगाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे संबंधीतांवर आयोगाच्या आदेशाची अवहेलना केल्याबाबत कारवाई करावी." अशी आयोगास विनंती केली आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, तक्रारकर्ता यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ग्रामपंचायत सावरगाव येथे दिनांक १०.०७.२०२० रोजी अर्ज सादर करुन मागितलेल्या एकुण ४ मुद्दयांबाबतची माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उपविभाग काटोल, जि. नागपूर या कार्यालयाकडून दिनांक २७.११.२०२४ रोजी प्राप्त झाली असून संपूर्ण समाधान झाले आहे. त्यामुळे यापुढे कोणत्याही प्रकारचा आक्षेप व उजर राहणार नाही, असे नमुद करुन दिनांक १२.१२.२०२४ रोजी तक्रारकर्ता यांनी स्वाक्षरीनिशी पोहच देवून आयोगास पत्र सादर केले आहे. त्यामुळे सदर प्रकरणात पुढील कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नसून प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वरील आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: १६.१२.२०२४

जा.क्र.-1807-दि.- 28 MAR 2025

E:\तक्रार क्र. 93/2023- गिरडकर.docx